# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- ३२३५/२०२२

**अपिलार्थी, श्री.सुनिल कडू कोळी,**
त्रिवेणी फ्लोरा, अ/२०३ गोल्डन ओक हॉटेल समोर,
कल्याण (प), जि.ठाणे ४२१ ३०१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक),
जिल्हा परिषद ठाणे, बी.जे.हायस्कूल,
टेंभी नाका, ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०१.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी,
शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे,
बी.जे.हायस्कूल, टेंभी नाका, ठाणे (प),
जि.ठाणे ४०० ६०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १८.११.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २६.०७.२०२२ | -- | ०७.११.२०२२ | -- |

अपिलार्थी यांनी दि. १९.०१.२०२३ रोजीच्या अर्जान्वये *" माहिती दिली नाही. प्रथम अपिलावर सुनावणी नाही किंवा आदेश पारित नाहीत. "* असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १८.११.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण यांनी आपल्या कार्यालयात प्रस्ताव क्र. १४४/२००६ दि.२४.०७.२००६ रोजी दाखल केलेला संपूर्ण प्रस्ताव नस्ती न्यायालयीन कामासाठी मिळण्याबाबत. "*

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही व आदेश पारित केले नाहीत. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल.

तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन आदेश निर्गमित करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यामुळे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

### आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २६.०७.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम

रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांनी अपीलार्थी यांनी दिनांक ०७.११.२०२२ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन निर्णय निर्गमित केलेला दिसून येत नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून आयोगासमोर सादर करावा. सदर मुदतीत लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरुन शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

४. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१८.०२.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १८ नोव्हेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे, बी.जे.हायस्कूल, टेंभी नाका, ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०१.

व

तत्कालीन जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे, बी.जे.हायस्कूल, टेंभी नाका, ठाणे (प.), जि.ठाणे ४०० ६०१.

**- यांना प्रत**

विद्यमान प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी,
शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे,
बी.जे.हायस्कूल, टेंभी नाका, ठाणे (प),
जि.ठाणे ४०० ६०१. **यांचे मार्फत रवाना.**

**सुनावणी दिनांक १८.०२.२०२६ ( In Continuation of order dt. १७.११.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.१८.११.२०२५ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविणेबाबत व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत व तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १८.०२.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्रीम.ललिता शहाजी दहितुले, शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे उपस्थित आहेत. तसेच विद्यमान प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.देविदास महाजन, शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांचे प्रतिनिधी श्री.प्रशांत कसबे, वरिष्ठ लिपीक उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संजय राऊत, अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजयकुमार सोनवणे, अधिक्षक गट-ब, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही.

आयोगाने दि.१८.११.२०२५ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना १५ दिवसात माहिती देण्याबाबत आदेशित केले होते. तथापि अद्यापपर्यंत अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना त्यांचा लेखी खुलासा सादर करणेबाबत आदेशीत केले होते. तथापि त्यांनी कोणताही खुलासा सादर केला नाही. तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्रीम.ललिता शहाजी दहितुले, शिक्षणाधिकारी व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संजय राऊत, अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांनी सुनावणीच्या वेळी त्यांना खुलासा सादर करण्यासाठी वेळेची मागणी केली आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. त्यांना त्यांचा लेखी खुलासा सादर करण्यासाठी एक संधी देण्यात येत आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजयकुमार सोनवणे, अधिक्षक गट-ब, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांनी आयोगाच्या दि.१८.११.२०२५ रोजीच्या आदेशानंतरही अपिलार्थी यांना माहिती दिलेली नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी श्रीम.ललिता शहाजी दहितुले, शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांनी आयोगाच्या दि.१८.११.२०२५ रोजीच्या आदेशाप्रमाणे लेखी खुलासा पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. सदर मुदतीत लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरुन शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संजय राऊत, अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांनी आयोगाच्या दि.१८.११.२०२५ रोजीच्या आदेशाप्रमाणे माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबतचा लेखी खुलासा पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजयकुमार सोनवणे, अधिक्षक गट-ब, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २६.०७.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन आयोगाच्या दि.१८.११.२०२५ रोजीच्या आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

४. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२५.०३.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १८ फेब्रुवारी, २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी श्रीम.ललिता शहाजी दहितुले, शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे, बी.जे.हायस्कूल, टेंभी नाका, ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०१. **व**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संजय राऊत, अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे, बी.जे.हायस्कूल जवळ, टेंभी नाका, ठाणे (प.), जि.ठाणे ४०० ६०१.

**- यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजयकुमार सोनवणे,
अधिक्षक गट-ब, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे,
बी.जे.हायस्कूल जवळ, टेंभी नाका, ठाणे (प.),
जि.ठाणे ४०० ६०१. **यांचे मार्फत रवाना**

**सुनावणी दिनांक २५.०३.२०२६ ( In Continuation of order dt. १८.०२.२०२६)**

**विवेचन**

उपरोक्त दि.१८.०२.२०२६ रोजीच्या सुनावणीच्या वेळी तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये, याबाबतचा खुलासा व तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २५.०३.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्रीम.ललिता शहाजी दहितुले, शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संजय राऊत व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजयकुमार सोनवणे, अधिक्षक गट-ब, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे उपपस्थित आहेत.

सदर प्रकरणी तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी श्रीम.ललिता शहाजी दहितुले, शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांनी त्यांचा खुलासा सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांचेकडे ठाणे महानगरपालिका

शिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार दि.१०.१२.२०२१ ते दि.२०.१०.२०२२ व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) मुळ कार्यभार असल्याने अनावधानाने सदर प्रकरणी अपिलात सुनावणी घेण्याचे राहून गेले. यामध्ये कोणताही हेतुपूर्वक व जाणिवपूर्वक दुर्लक्ष करण्याचा हेतु नव्हता.

तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी श्रीम.ललिता शहाजी दहितुले, शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांचा हा खुलासा बघता, अतिरिक्त कार्यभारामुळे त्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊ शकल्या नाहीत असे दिसून येते. तथापि प्रथम अपिलीय प्राधिकारी म्हणून काम करताना प्राप्त झालेल्या प्रथम अपिलावर सुनावणी घेणे वैधानिक प्रक्रिया आहे. ही बाब लक्षात घेता माहिती अधिकारी अधिनियमांतर्गत वैधानिक प्रक्रिया पार पाडताना आवश्यक ती दक्षता घेणे आवश्यक आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संजय राऊत, अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांनी त्यांचा खुलासा सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांना माहिती देण्यासाठी झालेला विलंब हा अनावधानाने झालेला असून, हेतुपुर्वक व जाणिवपुर्वक दुर्लक्ष करण्याचा कोणताही हेतू नव्हता.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संजय राऊत, अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांचा हा खुलासा बघता माहिती देण्यास झालेल्या विलंबासाठी त्यांनी कोणतेही समर्थनिय कारण दिलेले नाही. अनावधानाने माहिती देण्याचे राहून गेले हा खुलासा मान्य होऊ शकत नाही. सबब त्यांचा खुलासा अमान्य करण्यात येत आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजयकुमार सोनवणे, अधिक्षक गट-ब, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांनी त्यांचा खुलासा सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांना माहिती रजिस्टर पोस्टाने देण्यात आलेली आहे. माहिती देण्यासाठी झालेला विलंब हा अनावधानाने झालेला असल्याचे त्यांनी खुलाश्यामध्ये नमूद केले आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजयकुमार सोनवणे, अधिक्षक गट-ब, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांनी सद्यस्थितीमध्ये अपिलार्थी यांना माहिती दिलेली असल्याने, त्यांचा हा खुलासा मान्य करण्यात येत आहे. तथापि त्यांनी दिलेली माहिती पाहता नस्ती त्यांच्या कार्यालयात आढळून येत नाही असे त्यांनी कळविले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद ठाणे यांचे कार्यालयात उपलब्ध असणे अपेक्षित आहे. असे असताना ती जर आढळून येत नसेल तर ती का आढळून येत नाही, याची कारणे त्यांनी अपिलार्थी यांना कळविणे आवश्यक होती. ती न कळविल्यामुळे त्यांनी अपिलार्थी यांना अपूर्ण माहिती दिली आहे असे स्पष्ट होते. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी श्रीम.ललिता शहाजी दहितुले, शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांना भविष्यात त्यांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत वैधानिक प्रक्रिया बजावताना दक्षता घेण्याची समज देण्यात येत आहे. त्यांचेवरील प्रस्तावित शिस्तभंगाची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संजय राऊत, अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांनी सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून, त्यांचा खुलासा अमान्य करण्यात येत आहे. त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्याकलम २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस कायम करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्याकलम २० (१) अन्वये रु.५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचे वेतनातून ०१ मासिक हप्त्यात वसूल करुन लेखाशीर्ष क्र.००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षा खाली जमा करावी. याबाबतची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिष्द, ठाणे यांनी आयोगास सादर करावा.

३. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजयकुमार सोनवणे, अधिक्षक गट-ब, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांनी सादर केलेला खुलासा समाधानकारक असून, त्यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. त्यांचेवरील प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

४. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजयकुमार सोनवणे, अधिक्षक गट-ब, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांनी अपिलार्थी यांना द्यावयाची माहिती त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध नसलेबाबतची कारणे अपिलार्थी यांना ०८दिवसात शिघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी व त्याबाबतचा अहवाल पुढील सुनावणीस उपस्थित राहून आयोगासमोर सादर करावा.

५. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०४.०५.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २५ मार्च, २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिष्द, ठाणे, बी.जे.हायस्कूल जवळ, टेंभी नाका, ठाणे (प.), जि.ठाणे ४०० ६०१.

३. आहरण व संवितरण अधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिष्द, ठाणे, बी.जे.हायस्कूल जवळ,

टेंभी नाका, ठाणे (प.), जि.ठाणे ४०० ६०१.

४. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संजय राऊत, अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे, बी.जे.हायस्कूल जवळ, टेंभी नाका, ठाणे (प.), जि.ठाणे ४०० ६०१.

**- यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजयकुमार सोनवणे,
अधिक्षक गट-ब, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे,
बी.जे.हायस्कूल जवळ, टेंभी नाका, ठाणे (प.),
जि.ठाणे ४०० ६०१. **यांचे मार्फत रवाना**

**सुनावणी दिनांक ०४.०५.२०२६ ( In Continuation of order dt.२५.०३.२०२६)**

**विवेचन**

उपरोक्त दि.२५.०३.२०२६ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना अहवाल सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०४.०५.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्री.विजयकुमार अशोक सोनवणे, अधीक्षक वर्ग-२, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद, ठाणे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजयकुमार सोनवणे, अधीक्षक गट-ब, शिक्षण विभाग(माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यंना माहिती पुरविण्यात आली आहे. सदर पत्राची प्रत त्यांनी सादर केली आहे. या पत्रामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही. ती गहाळ झाल्याबाबत ठाणे पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल करण्यात आलेली आहे.

याप्रकरणी शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे विभागातून मोठ्या प्रमाणात अभिलेख गहाळ झाला असल्याने, दुसऱ्या एका प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्या प्रकरणाची सुनावणी दि.०३.०६.२०२६ रोजी ठेवण्यात आली आहे. सबब या प्रकरणाची सुनावणी देखील दि.०३.०६.२०२६ रोजी ठेवण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०३.०६.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०४ मे, २०२६ .

**सुनावणी दिनांक ०३.०६.२०२६ ( In Continuation of order dt.०४.०५.२०२६)**

**विवेचन**

उपरोक्त आदेशानुसार सदर प्रकरणाची पुढील सुनावणी आज दि.३/६/२०२६ रोजी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजयकुमार सोनवणे, अधिक्षक सा.रा.से गट ब, माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद ठाणे व विद्यमान प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.देविदास महाजन, शिक्षणाधिकारी माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद ठाणे आणि श्री.भारत चौधरी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ठाणेनगर पोलीस ठाणे उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांनी दि.२/६/२०२६ रोजीच्या पत्रान्वये त्यांचा अहवाल सादर केलेला आहे, त्यामध्ये त्यांनी असे म्हटले की, महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्र.माशाअ-२०२२/प्र.क्र.२७५/एसएम४ दि.२४/४/२०२३ मधील टप्पा क्र.२ नुसार आवक जावक नोंदवहीचा शोध घेऊनही ती मिळत नसल्यास या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी. चौकशीमध्ये दोषी असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांची नावे पदनाम निश्चित करून जबाबदारी निश्चित करावी. तद्नंतर त्यांचेविरोधात अशा प्रकरणी अभिलेख कायद्यातील तरतूदीनुसार एफ.आय.आर दाखल करण्याची कार्यवाही करणेबाबत नमूद आहे.

दि.२४/४/२०२३ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार शिक्षण (माध्यमिक) विभाग, जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत पात्र शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांना अनुदान तातडीने उपलब्ध होणे असून, शिक्षण (माध्यमिक) विभागाकडील आवक जावक या सारखा संवेदनशील दस्तऐवज गहाळ झालेबद्दल तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्र.ठाजिप/साप्रवि/आस्था २/५९/२०२३ दि.२९/९/२०२३ अन्वये उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जि.प.ठाणे यांना शिक्षण (माध्यमिक) विभागाची सखोल चौकशी करण्याचे आदेशीत केलेनुसार सदर चौकशी समितीने त्यांचेकडील क्र.ठाजिप-साप्रवि/३६१६/२०२३ दि.१८/१०/२०२३ अन्व्ये चौकशी अहवाल सादर केलेला आहे.

या चौकशी अहवालातील निष्कर्षावरून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे अहवालात असे नमूद केले की, शिक्षण माध्यमिक विभागाची शोध मोहीम थोडया फार प्रमाणात जावक नोंदवही व शिबिर रजिस्टर नोंदवही हे दस्तएवज उपलब्ध झाले आहेत व काही अभिलेख

वाळवी लागल्यामुळे ते पूर्णपणे खराब झाले आहेत तसेच त्या व्यतिरिक्त कोणतेही अभिलेख आढळ झाले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. विभागातील जावक रजिस्टर फाडणे व सीसीटीव्ही बंद करणे व चौकशीतील कर्मचाऱ्यांच्या निवेदनातील बाबी पाहता काही दफ्तर गहाळ झाल्याची शक्यता नाकरता येत नाही. तरी याबाबत जबाबदार कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी असे मत व्यक्त केले आहे.

सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी माध्यमिक यांना शासन सूचना प्रमाणे पुढील कार्यवाही करणेबाबत निर्देश दिल्याचे चौकशी अहवालावर नमूद आहे. त्यानुसार चौकशी अहवालात नमूद प्रथम शिस्तभंगविषयक कार्यवाही करणेचे अनुषगाने कारणे दाखवा नोटीस बजाविणेकरीता नस्ती सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद ठाणे यांचे अभिप्राय घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे विनाविलंब सादर होणे आवश्यक होते. तथापि सदर नस्तीची हालचाल पाहता आवक जावक सारख्या संवदेनशील दस्तऐवज गहाळ प्रकरणी शिस्तभंगविषयक गंभीर दिरंगाई झाल्याची बाब आपल्या निदर्शनास आली आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे अहवालात म्हटले आहे. सदर नस्तीची हालचाल पाहता सदरची नस्ती मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयास चौकशी अहवाल सादर केलेपासुन ते सुनावणीदरम्यान या आयोगाने दिलेले आदेश या दरम्यानच्या कालावधीत एकदाही म्हणजे तब्बल दोन वर्षापेक्षा अधिक कालावधी उलटूनही तत्कालिन तसेच विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेसमोर सादर करण्यात आलेला नाही.

सदर चौकशीच्या अनुषंगाने पहिल्यांदाच विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे दि.२/२/२०२६ रोजी ई ऑफिस प्रणालीव्दारे नस्ती प्राप्त झालेली असल्याने शिक्षण (माध्यमिक) विभागाने सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय प्राप्त करून घेऊन आवक जावक नोंदवही तसेच वैयक्तिक मान्यता नस्ती गहाळ प्रकरणात एक ते दहा कर्मचाऱ्यांना ज्ञापन व १ ते ४ जोडपत्र बजावणेकरीता कार्यवाहीस विलंब होऊ नये याकरिता प्रस्तावित केलेनुसार सदर कार्यवाहीस मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि सदर प्रकरणात बऱ्याच कर्मचाऱ्यांची नावे तत्कालिन शिक्षणाधिकारी माध्यमिक श्रीमती ललिता दहितुले यांनी वगळल्याची बाब निर्दशनास आली असता वगळण्यात आलेल्या जबाबदार कर्मचांऱ्या विरूध्द पुन्हा शहानिशा करून दोषारोप दोन दिवसात सादर करणेबाबत तसेच नस्ती विलंबास जबाबदार अधिकारी कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजाविणेबाबत दि.१७/३/२०२६ रोजी कळविण्यात आले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार दोन कर्मचारी हे राज्य शासकीय कर्मचारी असल्याने त्यांचे दोषारोप बजाविणे बाबत शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचे स्तरावरून सदरची संपूर्ण नस्तीच ई ऑफिस प्रणालीमधून विभागीय संचालक मुंबई यांना वर्ग केल्याची बाब निर्दशनास आली आहे. अशा पध्दतीच्या नस्ती सादर करणेकरिता विलंबा प्रकरणी वेळेच अपव्यय करणाऱ्या संदर्भातील कामकाजाबाबत विद्यमान शिक्षणाधिकारी माध्यमिक यांना समज देणेत आलेली आहे. वारंवार केलेल्या पाठपुराव्याअंती सदर नस्ती विभागीय संचालक मुंबई विभाग यांचे स्तरावरून दि.४/५/२०२६ रोजी शिक्षण माध्यमिक विभागास ई ऑफिस प्रणालीव्दारे परत करण्यात आली आहे.

तद्नंतर शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी दि.५/५/२०२६ रोजी सामान्य प्रशासन विभागामार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर केली असता. सदर प्रकरणी तत्कालिन शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी चौकशी प्रक्रियेतून वगळलेल्या अकरा जिल्हा परिषद कर्मचारी यांना व दोन राज्य शासकीय कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजाविणेकरीता मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदर प्रकरणी जबाबदार असलेल्या तत्कालिन अधीक्षक श्रीमती भारमळ व तत्कालिन कक्ष अधिकारी श्रीमती दारोठे यांचा चौकशी समितीने दिलेल्या अहवालात समावेश नसला तरीही त्या जबाबदार असल्याचे दिसत असल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीस बजाविणेकरीता सादर करणेबाबत अभिप्राय नमूद करून मान्यता देण्यात आलेली असून, ज्या दहा अधिकारी कर्मचारी यांना दोषारोप बजाविणेस दि.१७/३/२०२६ रोजी मान्यता देण्यात आली होती. त्या कर्मचारी यांनी दोषारोपाचे केलेले खुलासे पाहता त्यांना बजाविणेत आलेले दोषारोप अत्यंत मोघम स्वरूपाचे असल्याचे दिसून आले. मोघम दोषारोप पत्रान्वये होणारी चौकशी अवैध ठरवून दोषी कर्मचारी यांची सुटका होऊ शकते. ही बाब विचारात घेता दोषारोप पत्र तयार करताना अत्यंत बारकाईने व तपशिलवर भाषा आहे का, याबाबत शिक्षण माध्यमिक विभागाने खात्री करून सामान्य प्रशासन विभागाने सदर दोषारोप पत्र वाचून ते स्पष्ट आहे का ते तपासून सादर करणेबाबत अभिप्राय नमूद करून मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सुधारित दोषारोपपत्र बजाविलेनंतर संबंधित अधिकारी कर्मचारी यांना त्यांचे म्हणणे मांडणेसाठी ८ दिवसाची मुदत देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मार्फत दि.२०/५/२०२६ रोजी परत करण्यात आली होती.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि.२०/५/२०२६ रोजी दिलेल्या अभिप्रायाच्या अनुषंगाने शिक्षण माध्यमिक विभागाने दि.२८/५/२०२६ रोजी सामान्य प्रशासन विभागामार्फत सादर केलेल्या नस्तीच्या अनुषंगाने दहा अधिकारी/कर्मचारी यांचे दोषारोप पत्रास मान्यता देण्यात आली असून चौकशी समिती अहवालात नमूद अधिकारी कर्मचारी यांची नावे वगळयात आलेल्या अधिकारी कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली असून तद्नअनुषंगिक पुढील कार्यवाही सद्यस्थितीत सुरू आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ठाणे यांचा हा अहवाल पाहता या प्रकरणात जिल्हा परिषद ठाणे यांनी कार्यवाही सुरू केली असल्याचे दिसून येते. उपस्थित असलेल्या शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी सदर कार्यवाही पुर्ण करणेसाठी १५ दिवसांचा कालावधी लागेल असे आयोगास सांगितले त्यांच्या या निवेदनाची नोंद घेण्यात आली.

श्री.भारत चौधरी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ठाणेनगर पोलीस ठाणे यांनी त्यांचा अहवाल सादर केलेला आहे, त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले की, ठाणेनगर पोलीस ठाणेतून उपलब्ध अभिलेखाची पडताळणी केली असता दि.१९/१०/२०२३ रोजी श्री.संजय विष्णू राऊत यांनी

दिलेल्या खबरीवरून पोलीस ठाणे दैनंदिनी नोंद क्र.०४६/२०:४८ दि.१९/१०/२०२३ नुसार प्रॉपर्टी मिसिंग रजिस्टर नंबर १५४४/२०२३ नोंद केलेली आहे. सदर नोंदीचे अवलोकन करता यामध्ये खबर देणार यांचे कार्यालयातील आवक जावक नोंदवह्या, कार्यविवरण नोंदवह्या, वैयक्तिक मान्यता शिबिर नोंदवह्या, आवश्यक नस्ती असे सन २००३ ते २०१७ या कालावधीत जिल्हा परिषद अभिलेख कक्ष ठाणे पश्चिम परिसरात कुठेतरी पडून गहाळ झाले असल्याचे नोंदीमध्ये नमूद केले आहे. खबर देणार श्री.संजय विष्णू राऊत यांनी त्यावेळी पोलीस ठाणेस दिलेली खबर ही अत्यंत त्रोटक व मोघम स्वरूपाची असल्याची दिसून येते.

त्यानंतर दि.१७/२/२०२६ रोजी शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद ठाणे श्री.देविदास महाजन यांनी ठाणेनगर पोलीस ठाणे "तक्रार दाखल करणेबाबत" या विषयान्वये अर्ज करून त्याव्दारे शिक्षण विभाग माध्यमिक जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत असलेले खालीलप्रमाणे कार्यालयीन अभिलेख या कार्यालयात आढळ होत नसल्याने सदर प्रकरणी संदर्भ क्र.२ अन्वये ठाणेनगर पोलीस ठाणे येथे एफआयआर क्र.१५४३/२०२३ नोंदविण्यात आला आहे. (प्रत्यक्षात सदर नोंद ही एफआयआर नोंदविण्यात आली नसून प्रॉपर्टी मिसिंग रजिस्टरमध्ये १५४३/२०२३ या क्रमांकावर त्याची नोंद घेण्यात आली आहे) या प्रकरणी राज्य माहिती आयोगाने अपील क्रमांक १८४२/२०२१ या प्रकरणात तक्रार दाखल करण्याचे आदेश दिले असल्याचे सदर तक्रारी मध्ये नमूद केले आहे व त्यामध्ये सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ८ व ९ अंतर्गत झालेल्या गुन्हयाचे स्वरूप स्पष्टपणे नमूद करून ठाणेनगर पोलीस ठाणे येथे आवश्यक त्या कलमातंर्गत व्यवस्थित तक्रार दाखल करावी व कार्यवाहीचा अहवाल लेखी स्वरूपात आयोगास पुढील सुनावणीस आयोगास सादर करावा असे आदेश दिलेले असल्याने सदर तक्रार दाखल करीत असलेबाबत नमूद केले आहे. सदरचा अर्ज ठाणे नगर पोलीस ठाण्यात आवक क्र.४९१/२०२६ दि.१७/२/२०२६ अन्वये प्राप्त झालेला असून त्याची चौकशी सहायक पोलीस निरीक्षक श्रीमती सपना ताटे या करीत आहेत.

या पत्राच्या अनुषंगाने चौकशी अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद ठाणे यांना दि.१९/२/२०२६ रोजी पत्र दिले असून, " *जिल्हा परिषद ठाणेच्या माध्यमिक शिक्षण विभागाने सन २००३ ते २०१७ या १५ वर्षाच्या कालावधीचा संपूर्ण अभिलेख आल्या विभागाकडून गहाळ झालेला असून यासाठी कसूदार कोण असणार आहेत, झालेली घटना अजानतेपणी झालेली आहे किंवा जाणीवपूर्वक केलेली आहे याबाबत सविस्तर माहिती कायदेशीर कारवाई करताना आपल्या विभागाकडून प्राप्त होणे अनिवार्य आहे. ही बाब शिक्षण विभागाशी निगडीत असल्याने आपल्या स्तरावर विशेष समिती नेमून त्या समितीचा सर्वकष स्वयंस्पष्ट चौकशी अहवाल कायदेशीर कारवाई करणेपूर्वी पोलीस ठाणेस प्राप्त होणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्या कार्यालयाकडून सादर झालेल्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने कायदेशीर कारवाई करणेसाठी नेमण्यात आलेल्या विशेष समितीचा अहवाल लवकरात लवकर उपलब्ध करून देणेची विनंती आहे. आपल्याकडून विशेष समितीचा अहवाल प्राप्त होताच पुढील कारवाई करणेची तजवीज ठेवीत आहे*" असे नमूद केले आहे. त्यानंतर अद्यापपावेतो शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचेकडून विशेष समितीचा चौकशी अहवाल पाठविण्यात आला नाही किंवा पत्रव्यवहार करण्यात आला नाही, कोणीही अधिकारी तक्रार देणेसाठी पोलीस ठाणेमध्ये आले नाही.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी त्यांच्या अहवालामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, सहायक पोलीस निरीक्षक श्रीमती ताटे-केचे यांनी पाठविलेल्या पत्रानुसार घडलेल्या घटनेचा कालावधी, गहाळ झालेले रजिस्टर, अभिलेख सुरक्षितपणे ठेवणेसाठी जबाबदार असलेले इसम, पद व त्यांची नावे, घटनेला जबाबदार असलेले सरकारी नोकर, त्यांचा उद्देश, त्यामुळे कोणाला फायदा, याबाबत वरिष्ठांनी विशेष समिती स्थापन केली किंवा कसे समितीचा अहवाल अशा सर्व कागदपत्रांसह कोणीही तक्रारदार पोलीस ठाण्यात उपस्थित न झालेने तसेच शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी दिलेल्या अर्जान्वये मोघम व त्रोटक स्वरूपाच्या माहितीच्या अनुषंगाने गुन्हा नोंद करण्यात आलेला नाही.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचा हा अहवाल पाहता जिल्हा परिषद ठाणे यांचेकडून दाखल तक्रार अतिशय त्रोटक स्वरूपाची गुन्हयाचे स्वरूप स्पष्ट न करणारी, आवश्यक कागदपत्रे सोबत न जोडणारी त्याचप्रमाणे यासाठी नेमण्यात आलेल्या चौकशी समितीच्या अहवालाविना दाखल करण्यात आलेली असल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक या तक्रारीवरून गुन्हा दाखल करू शकले नाहीत. त्यांनी या संदर्भातील अधिकची माहिती जिल्हा परिषदेकडे मागितलेली आहे, असे दिसून येते.

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ठाणे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक ठाणेनगर पोलीस ठाणे या दोघांच्या अहवालाचे एकत्रित वाचन केले असता दिसून येते की, जिल्हा परिषद स्तरावरील चौकशी समितीकडून दोषारोपपत्र देण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यापैकी काहीवर दोषारोप बजाविणेची कार्यवाही सुरू असून काहीवर बजाविणेत आले आहे. या कार्यवाहीसाठी सक्षम प्राधिकारी यांची मंजूरी घेण्यात आल्याचे दिसून येते. जिल्हा परिषद स्तरावरील कार्यवाही पूर्ण होण्यासाठी अधिकचा १५ दिवसाचा वेळ लागणार आहे असे विधान शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी केलेले असल्याने अधिकचा तेवढा वेळ देण्यास हरकत नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. शिक्षणाधिकारी माध्यमिक, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांनी ठाणेनगर पोलीस ठाण्यातील चौकशी अधिकारी यांनी मागणी केलेली माहिती त्यांना विनाविलंब पाठवावी व त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ठाणेनगर पोलीस ठाणे यांनी तातडीने या प्रकरणी

गुन्हा दाखल करून पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी. याबाबतचा अहवाल या दोन्ही अधिकारी यांनी पुढील सुनावणीस सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१३.०७.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

सही/
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३ जून, २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे,
बी.जे.हायस्कूल, टेंभी नाका, ठाणे जि.ठाणे ४००६०१

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
ठाणेनगर पोलीस ठाणे, जुहू चंदन सोसायटी,
जांभळी नाका, ठाणे पश्चिम ४००६०१.

## सुनावणी दिनांक १३.०७.२०२६ ( In Continuation of order dt.०३.०६.२०२६)

## विवेचन

उपरोक्त आदेशानुसार सदर प्रकरणाची पुढील सुनावणी आज दि.१३/७/२०२६ रोजी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी श्री.सुनिल कोळी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.देविदास महाजन शिक्षणाधिकारी माध्यमिक, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद ठाणे व श्रीमती व्दारका डोखे, पोलीस निरीक्षक(गुन्हे), ठाणेनगर पोलीस ठाणे उपस्थित आहेत.

श्री.देविदास महाजन शिक्षणाधिकारी माध्यमिक, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांनी त्यांचा जा.क्र.ठाजिप/शिक्षण/माध्य/आस्था-२/२०२६/२३६३५५९ दि.१०/७/२०२६ चे पत्रान्वये आयोगास अहवाल सादर केला, त्यामध्ये त्यांनी एकूण २१ कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजाविल्याचे नमूद केले आहे. त्यापैकी १२ जिल्हा परिषद आस्थापनेवरील असून, उर्वरित ९ कर्मचारी राज्य शासकीय आस्थानेवरील आहे असे म्हटले आहे. त्या सर्व कर्मचारी यांनी सादर केलेले खुलासे अमान्य केले असून त्यांना पुनश्च अंतिम कारणे दाखवा नोटीस बजाविणेची कार्यवाही सुरू आहे. वरीलप्रमाणे कर्मचाऱ्यांवर कार्यवाही सुरु असून, सदर कार्यवाही महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक नियम १९६७(जि.प.आस्थापना) व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) १९७९ (राज्य शासकीय आस्थापना) नुसार विभागीय चौकशी विभागीय आयुक्त स्तरावर व शिक्षण आयुक्त स्तरावर करण्यात येणार असल्याने सदर प्रक्रियेस किमान ९० दिवसांचा कालावधी लागणार आहे. तरी सदर चौकशीमध्ये दोषी आढळणाऱ्या दोषी कर्मचाऱ्यांची नावे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ठाणेनगर पोलीस ठाणे यांना कळविण्यासाठी अतिरिक्त १२० दिवसांची मुदतवाढ मिळावी अशी विनंती श्री.महाजन यांनी केली.

आयोगाकडे दि.३/६/२०२६ रोजी झालेल्या सुनावणीवेळी श्री.देविदास महाजन यांनी १५ दिवसांचा वेळ आयोगाकडून मागून घेतला होता व त्यानुसार त्यांनी आतापर्यंत सदरचा अभिलेख गहाळ होणेसाठी ज्यांच्यावर संशय आहे अशा अधिकारी/ कर्मचारी यांची नावे पोलीस यांना कळविणे आवश्यक होते. तथापि तशी कार्यवाही झालेली दिसून येत नाही. आज ते अधिकचा १२० दिवसांचा वेळ आयोगाकडे मागणी करत आहेत.

श्री.देविदास महाजन यांनी दिलेल्या या अहवालाचे अवलोकन केल्यावर दिसून येते की, या संपूर्ण २१ कर्मचारी यांचेवर विभागीय चौकशी पुर्ण होऊन त्यानंतर त्या कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचा मानस आहे. ही प्रक्रिया १२० दिवसात पूर्ण होण्याची शक्यता दिसून येत नाही. वस्तुत: प्राथमिक चौकशीमध्ये ज्या कर्मचारी यांनी सदर अभिलेख गहाळ केले असण्याची शक्यता आहे, अशा संशयित कर्मचाऱ्यांचा शोध घेण्याची अपेक्षा असते. परंतु याप्रकरणी सन २००३ ते २०१७ या कालवाधीमध्ये जेवढे कर्मचारी वैयक्तिक मान्यता नस्ती व आवक जावक रजिस्टर आणि संबंधित अभिलेख या संबंधीचे कामकाज पाहत होते, त्या सर्व कर्मचारी यांना नोटीस देण्यात आलेल्या आहेत. कोणत्याही प्रकारची चौकशी, सदर चौकशी समितीने केलेली आहे असे दिसून येत नाही. अभिलेख ठेवण्याची एक पध्दत असते त्या पध्दतीनुसार तो किती तारखेपर्यंत उपलब्ध होता, किती तारखेपर्यंत

तो उपलब्ध होऊ शकला नाही, कोणत्या कर्मचारी यांच्या कालावधीमध्ये तो गहाळ झालेला आहे अशाप्रकारच्या बाबींची चौकशी करून संशयित कर्मचारी यांचा शोध घेणे हे चौकशी समितीचे काम आहे. सरसकटपणे १५ वर्ष कालावधीत जेवढे कर्मचारी कार्यरत होते त्या सर्वांना नोटीस देणे आणि त्यांचे खुलासे अमान्य करणे याला जर शिक्षणाधिकारी माध्यमिक व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ठाणे हे चौकशी समजत असतील तर अशा चौकशीतून ना दोषी कर्मचारी सापडू शकतील ना गहाळ अभिलेख सापडू शकेल. जिल्हा परिषदेस या प्रकरणी खरोखरच चौकशी करायची आहे की चौकशीचा आभास निर्माण करावयाचा आहे असा देखील आयोगास प्रश्न पडलेला आहे.

नेमक्या किती नस्ती गहाळ झालेल्या आहेत यासंदर्भात श्री.देविदास महाजन यांचेकडे चौकशी केली असता ते निश्चित संख्या सांगू शकले नाही. आता आपणास काही नस्ती सापडल्या आहेत असेही वक्तव्य त्यांनी सुनावणीदरम्यान केले.

प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.देविदास महाजन, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी असे निवेदन केले की, त्यांचा सुधारीत अहवाल एक आठवडयात ते सादर करतील. त्यांना एक आठवडयाची संधी देण्यात येत आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.देविदास महाजन, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांना सुधारीत अहवाल एक आठवडयात आयोगास सादर करावा. या अहवालामध्ये निश्चितपणे कोणत्या कालावधीत अभिलेख गहाळ झाला, त्यासाठी संशयित कोण आहेत या बाबींचा समावेश असेल तसेच गहाळ झालेल्या संपूर्ण अभिलेखाची यादी त्यासोबत सादर करावी. दरम्यानच्या कालावधीत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ठाणेनगर पोलीस ठाणे यांनी गुन्हा दाखल करून त्यांचे स्तरावर कार्यवाही करावी.

२. शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांचा सन २००३ ते २०१७ या कालावधीचा अभिलेख गहाळ झालेला आहे. असे असतानाही शिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद ठाणे व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे हे आयोगाच्या आदेशानुसार योग्य ती कार्यवाही करत नाहीत टाळाटाळ करीत आहेत असे दिसून येते. सदरची बाब गंभीर असल्याने **शिक्षण आयुक्त, पुणे** यांच्या निर्दशनास आणणच्या दृष्टीने या आदेशाची प्रत त्यांना पाठविण्यात येत आहे.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.३०/७/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १३ जुलै २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

शिक्षण आयुक्त, पुणे
शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे ४११००१

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे,
बी.जे.हायस्कूल, टेंभी नाका, ठाणे जि.ठाणे ४००६०१

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
ठाणेनगर पोलीस ठाणे, जुहू चंदन सोसायटी,
जांभळी नाका, ठाणे पश्चिम ४००६०१.